नि.दि.मु.क्र. २०/२०१७

निशाणी ४९ सोबत

**वादी तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा पुढील सरतपास नाही.**

**प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा उलटतपास विधीज्ञ श्री. एच. एम. कुलकर्णी यांचे मार्फत शपथेवर सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, मला वादी क्र. १/१, १/२ व १/४ यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये साक्ष देण्यासाठी कुलमुखत्यारपत्र/अधिकारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १/१, १/२ व १/४ यांची मानसिक व शारीरीक प्रकृती चांगली असून ते हिंडत फिरत असतात. हे म्हणणे खरे आहे की, वरील तिघे न्यायालयात येवून साक्ष देखील देवू शकतात. *वरील तिघांना न्यायालयासमोर पुरावा देवून तपासण्याची आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. १/१, १/२ व १/४ यांना न्यायालयासमोर तपासल्यानंतर वादीचा दावा खोटा ठरेल त्यामुळे त्यांना तपासण्याची आवश्यकता नाही. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झाले आहे. माझा सोन्याचा व्यापार आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी क्र. १ रघुनाथ व मी एकत्र राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्हा सर्वांच्या चुली व देवघर वेगळ्या आहेत. माझी जन्म तारीख दि. ०१.०६.१९७३ अशी आहे.

Anoip
30/08/2025

हे म्हणणे खरे नाही की, मी गट क्र. ९२८ चे १ हे ४१ आर हे क्षेत्रफळ चुकीचे नमुद केले आहे. मी दावा दाखल करणेपूर्वी वाद मिळकतींचे उतारे माझे वकीलांना दिले होते. साक्षीदारास आता नि.क्र. ६ वरील गट नं. ९२८ चा ७/१२ उतारा दाखविण्यात आला. साक्षीदार उतारा पाहून सांगतो की, त्यावर ४१ आर इतके क्षेत्र नमुद

नि.क्र. ९० वरील दि. 14-10-2025 रोजीच्या आदेशान्वये मजकूर समाविष्ट करून दुरुस्ती करण्यात आली *
Anoip
14-10-2025
JrCJJD

**प्रश्न – वरील तिघांना न्यायालयासमोर पुरावा देवुन तुम्ही तपासणार आहात का ?**

उत्तर – वरील तिघांना न्यायालयासमोर पुरावा देवून तपासण्याची **मला** आवश्यकता **वाटत** नाही.

आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये गट नं. ९२८ चे नमुद क्षेत्र १ हे ४१ आर चुकीचे नमुद केले आहे. हे मला माहित नाही की, गट नं. ९२८ चा मुळ सर्व्हे नं. ६२/६ होता किंवा कसे. माझे सरतपासाचे शपथपत्रातील परिच्छेद क्र. १ पान.क्र. ३ मधील मजकूराबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दाव्यासोबत सादर केलेल्या वंशावळीसोबत प्रतिज्ञालेख सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची वंशावळ अपूर्ण व खोटी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्हा कदम लोकांचे मुळ गाव इरळी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मसु कदम यांच्यापासून आमचे पाचव्या पिढीचे राहणे इरळी या गावी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वंशावळीमधील सर्व मयत लोकांचा मृत्यू इरळी या गावीच झालेला आहे. कदमाचीवाडी हे गाव मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, इरळी व कदमाचीवाडी हे वेगवेगळे आहेत. सदर दोन्ही गावे एक असल्याचा दस्त मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही गावामध्ये १० ते १४ किमी इतके अंतर आहे. साक्षीदार सांगतो की, दोन ते अडीच किमी इतके आहे. हे म्हणणे खरे नाही की, दादा मसु कदम यांचा मृत्यू दि. ०५.०६.१९१३ रोजी झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दादा कदम हे कदमाचीवाडी या गावी राहत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दादा कदम यांचा मृत्यू कदमाचीवाडी येथे झाला नव्हता. दादांचे निधन कोठे झाले याची माहिती दत्तू यास नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दादांचे निधन कोठे झाले याचे वैयक्तिक ज्ञान मला देखील नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत प्रकरणात दादांच्या निधनाबाबतचा दस्त सादर केलेला आहे. सदरचा दस्त नि.क्र. ७५ वर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा दस्त खोटा व बनावट आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ७५ वरील उतारा दादा मसु कदम यांच्या मृत्यूबाबतचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर उतारा मोडी लिपीतील आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर उता-

यावर ब्रिटीश सरकार अथवा सांगली संस्थानाचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ नावातील साधर्म्य पाहून इतर व्यक्तीचा उतारा दाखल केलेला आहे.

मी माझ्या सरतपासाच्या शपथपत्राच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेला इरळी या गावचा पत्ता बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कदमाचीवाडी येथे राहत असल्याबाबतचा पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ७५ वरील उता–याचे मुळ शासकीय अभिलेख मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ७५ वरील दादा यांच्या मृत्यूबाबतची माहिती कोणाकडून मिळाली याचा तपशील दाव्यामध्ये अथवा माझ्या शपथपत्रामध्ये नमुद नाही.

हे म्हणणे खरे आहे की, दादा व जिजाबाई हे पती पत्नी होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोघांना येसू, केसू व बापू अशी तीन मुले होती. हे म्हणणे खरे आहे की, येसू सर्वात मोठा, केसू मधला व बापू सर्वात लहान होता. हे म्हणणे खरे नाही की, दादा यांचे निधन सन १९३२–३३ सालामध्ये झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, दादांच्या मृत्यूपूर्वी त्यांची तीन मुले येसू, केसू व बापू यांचा मृत्यू झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यासोबत दाखल वंशावळीमध्ये केस व बापू यांची नावे नमुद केलेली नाहीत. हे मला माहित नाही की, केसूच्या पत्नीचे नाव अंजू होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, येसू, केसू व बापू यांचा मृत्यूचा उतारा मी दाखल केलेला नाही. वरील तिघांचे निधन कधी व कोठे झाले याची माहिती मला व दत्तूला नाही. हे मला माहित नाही की, जिजाबाईचे तिचा धाकटा मुलगा बापू वर प्रेम होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८.०१.१९३४ रोजी जिजाबाई हिने पांडू मारुती कदम याचा मुलगा गणपती यास दत्तक घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर दत्तक विधानानंतर गणपती याचे नाव बापू असे ठेवण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दादाच्या हयातीमध्ये त्यांच्या

Amoli
30/08/2025

तीनही मुलाचा मृत्यू झाल्याने दादा मसु कदम हे एकमेव वारस राहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, दादा यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सर्व मिळकती केवळ बापू यालाच मिळाल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, येसूची पत्नी जनाबाई व दत्तक पुत्र कृष्णा यांना दादाच्या मिळकतीमध्ये कोणतेही अधिकार नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जनाबाई येसू कदम हिने तात्या कदम यांचा मुलगा कृष्णा यास दि. २१.१२.१९३३ रोजी दत्तक घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२.१२.१९३३ रोजी जनाबाई हिने कृष्णा यास दत्तक घेतले असे घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जिजाबाई व जनाबाई यांच्यामध्ये वाद झाल्यामुळे दि. ०८.०१.१९३४ रोजी पांडु कदम यांचा मुलगा गणपती यास दत्तक घेतल्याचा मजकूर माझ्या दाव्यामध्ये नमुद नाही. दत्तू यांची जन्म तारीख माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, शहाबाई हि वादी दत्तूची बहिण होती व ती दावा दाखल करणेपूर्वी मयत झाली हा मजकूर माझ्या दाव्यामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर शहाबाईचा उल्लेख दाव्यासोबतच्या वंशावळीमध्ये केलेला नाही. शहाबाई हिचा विवाह शंकर शिंदे रा. नागज यांच्याशी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, शहाबाई माझी आत्या होती. शहाबाई हिस नामदेव, तानाजी, पांडुरंग अशी तीन मुले व एक मुलगी होती. मुलीचे नाव मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, शहाबाई हिच्या वारसांना प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, शहाबाई हिने हक्कसोड केलेला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी आपसात वाटप करुन घेतलेले आहे. हे मला माहित नाही की, सदर नोंदणीकृत वाटप दस्ताआधारे फेरफार क्र. ३३८१ मंजूर झालेला आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी माझे वडीलांचे अपरोक्ष वाटणीपत्राचा देखावा केल्याचे मी खोटे सांगत आहे. मी

Amoli 30/08/2025

फेरफार क्र. ३३८१ विरुद्ध आक्षेप घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यामध्ये झालेल्या वाटणीपत्रकाबाबत मी दावा दाखल केलेला नाही. सदर नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१७ असून तो कवठेमहांकाळ न्यायालयात प्रलंबित आहे. साक्षीदार सांगतो की, सदरचा दावा प्रस्तुतचा दावा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यातील वाटणीपत्र रद्द होवून मिळण्याबाबत दाद मागितलेली नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यातील वाटणीपत्राबाबत मला सप्टेंबर २०१६ मध्ये माहिती झाली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यामध्ये झालेले वाटणीपत्र आम्हाला मान्य असल्यामुळे तशी दाद मागितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकती या दादा मसु कदम यांच्या वाडवडीलार्जित व हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्याचे मी खोटे सांगत आहे.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील अधोरेखांकित भाग अ मधील मजकूर मी चुकीचा नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील अधोरेखांकित भाग ब मधील मजकूर मी चुकीचा नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ६ मधील संपूर्ण मजकूर मी चुकीचा नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासाचे शपथपत्रातील कलम नं. ७ मध्ये नमुद कब्जे गहाण खत, कब्जे गहाण पत्रास मान्यता पत्र व दि. १५.०८.१९४१ रोजीचे वाटपपत्र याबाबत मला दावा दाखल करणेपूर्वी माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ७ मधील मजकूर दाव्यामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ८ मधील मजकूर दाव्यामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. १३.०८.१९४१ रोजीचे मुळ मान्यता पत्र

याकामात दाखल केलेले नाही. साक्षीदार सांगतो की, सही शिक्याचा दस्त दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्ताची मुळप्रत दाखल व्हावी याबाबत मी पुर्तता केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जिजाबाई व अनुबाई यांनी लक्ष्मण कदम यांना करुन दिलेल्या गहाण खतामध्ये रिव्हीजन सर्व्हे नं. १७ चा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १३.०८.१९४१ रोजीच्या मान्यता पत्रामध्ये रिव्हीजन सर्व्हे नं. १७ चा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिल्पा गोगटे यांनी दि. १३.०८.१९४१ चा मुळ दस्त पाहून भाषांतर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जिजाबाई व जनाबाई यांची मुळ दत्तकपत्रे या कामात दाखल केलेली नाहीत. मी मुळ दत्तकपत्र पाहिलेले आहेत.

**विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

**जबाब माझेसमक्ष नोंदवला.**

30/08/2025

**कवठे महांकाळ**
**(एम. ए. कुलकर्णी)**

**दिनांक :** ३०/०८/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश 'क'स्तर,
कवठेमहांकाळ